International Indexed & Referred Research Journal, July , 2012. ISSN- 0974-2832, RNI-RAJBIL 2009/29954;VoL.IV *ISSUE-42

शोध पत्र- भूगोल

# अमरावती जिल्ह्यातील लोकसंख्या वितरणाचे भौगोलिक विश्लेषण

July, 2012

* डॉ. मनोज गाथे

* आर. डी. आय. के. के. डी. महाविद्यालय, बडनेरा, अमरावती

**लोकसंख्या ही एक नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. मानव आपल्या जोरावर नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करुन घेत असतो व त्यातून आर्थिक उत्पादने निर्माण करतो. राष्ट्राच्या आर्थिक उत्पन्नाबरोबरच त्या राष्ट्राचे सार्वभौमत्व, संरक्षण व राष्ट्राचा विकास घडवून आणण्यासाठी लोकसंख्येला महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळेच देशातील लोकसंख्या ही त्या देशातील एक महत्त्वाचे शक्तीसाधन समजले जाते.**

**लोकसंख्येचे वितरण म्हणजे कोणत्या भागात किती लोकसंख्या राहते हे पाहणे होय. लोकसंख्येच्या वितरणाचा अभ्यास करण्यासाठी लोकसंख्येच्या घनतेचा आधार घ्यावा लागतो. निरनिराळ्या प्रकारच्या योजना आखतांना लोकसंख्येचा विचार करावाच लागतो. लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक, आर्थिक, सामाजिक तसेच इतर अनेक घटकांचा परिणाम होत असतो. तसेच प्रदेशाच्या सुगमतेचाही परिणाम होत असतो. अमरावती जिल्ह्यातील लोकसंख्येच्या वितरणावरही या सर्व घटकांचा परिणाम झालेला दिसतो. परिणामत: जिल्ह्यातील लोकसंख्येचे वितरण असमान झालेले दिसते. जिल्ह्याचा वायव्येकडील भाग पर्वतीय असल्यामुळे येथे लोकसंख्या कमी तर मैदानी प्रदेशात तसेच उत्तरेकडील पायनघाटच्या प्रदेशात लोकसंख्या जास्त आढळते.**

**अमरावती जिल्ह्यात १९८१ ते २००१ या वीस वर्षात लोकसंख्येचे वितरण कशाप्रकारे झाले आहे हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे.**

**प्रस्तावना :-**

भारत हा कृषीप्रधान देश असून आज भारताची लोकसंख्या १२१ कोटीवर पोहोचली आहे. ६५ टक्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. आज अन्नधान्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे लोकसंख्येचा दबाव कृषीवर मोठ्या प्रमाणात आढळतो. कोणत्याही देशातील लोकसंख्या ही त्या देशातील महत्त्वाचे शक्तीसाधन समजले जाते. वाढती लोकसंख्या लोकांना अन्नधान्य व सार्वजनिक आरोग्यविषयक सुविधा पुरविणे यातच राष्ट्राची मोठी शक्ती खर्ची पडते व यामुळे विकासाचा वेग मंदावतो. भारताची वाढती लोकसंख्या ही आर्थिक विकासातील एक प्रमुख समस्या आहे.

लोकसंख्येच्या अभ्यासात लोकसंख्येचे वितरण, घनतेला अतिशय महत्त्व असते. कोणत्याही प्रदेशाचा विकास घडवून आणतांना लोकसंख्येच्या घनतेचा विचार करावा लागतो. नैसर्गिक साधनसंपत्ती आणि लोकसंख्येचे वितरण याचे दर्शक लोकसंख्येची घनता असते. १९८१ ते २००१ या वीस वर्षात अमरावती जिल्ह्यातील लोकसंख्येचे वितरण कशाप्रकारे झाले आहे याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे :-**

१९८१ ते २००१ या वीस वर्षातील अमरावती जिल्ह्यातील लोकसंख्येचे वितरण कशाप्रकारे झाले आहे त्याचे विश्लेशण करणे, तसेच कारणमिमांसा करणे.

**अभ्यासक्षेत्र :-**

अमरावती जिल्ह्याचे स्थान सर्वसाधारणपणे महाराष्ट्र राज्याच्या ईशान्य भागात उत्तर सरहद्दीला लागून आहे. अमरावती जिल्ह्याच्या पूर्वेस नागपूर व वर्धा जिल्हा, दक्षिणेस यवतमाळ, अकोला व वाशिम जिल्हा, नैऋत्येस बुलढाणा जिल्हा तर जिल्ह्याच्या उत्तर सिमेपलिकडे मध्यप्रदेश राज्य सुरु होते. अमरावती जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार २००-३२' उत्तर ते २१०-४६' उत्तर अक्षांस आणि ७६०-३७' ते ७८०-२७' पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १२२१२ चौ.कि.मी असून २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या २६,०७,१६० आहे. जिल्ह्यात १४ तालुके आहेत.

**माहितीचे संकलन आणि संशोधन पद्धती :-**

सदर शोध निबंधासाठी मिळविलेली लोकसंख्येची आकडेवारी द्वितीय स्वरुपाची आहे. जिल्हा जनगणना पुस्तीका, आर्थिक व सामाजिक समालोचन इ. घेतलेली आकडेवारीचा नकाशाशास्त्रीय पद्धतीने तसेच सांख्यिकीय पद्धतीने वापर केला आहे.

**विवेचन आणि स्पष्टीकरण :-**

१९८१-८२ यावर्षी अमरावती जिल्ह्याची लोकसंख्या १८,६१,४१० होती तर २००१-०२ यावर्षी २६,०७,१६० होती. म्हणजेच १९८१-२००१ या वीस वर्षात जिल्ह्याची लोकसंख्या ७,४५,७५० वाढली. म्हणजेच गेल्या दोन दशकात लोकसंख्येमध्ये ४०.६० टक्के वाढ झाली. (सारणी क्र.१ मध्ये अमरावती जिल्ह्याची लोकसंख्या दिली आहे.)

१९८१ यावर्षी तालुक्यानुसार लोकसंख्येचे वितरण पाहिल्यास सर्वात जास्त लोकसंख्या ७४अमरावती तालुक्याची ६,०२,५८५ म्हणजेच ३२.३७ टक्के होती. तर सर्वात कमी मेळघाट तालुक्यातील १,४२,८१० (७.६७ टक्के) होती. १९९१ यावर्षी जिल्ह्याची लोकसंख्या २२,००,०५७ होती. यावर्षी सुद्धा सर्वात जास्त लोकसंख्या अमरावती तालुक्याची ५,३४,९८६ म्हणजेच २४.३२ टक्के होती. १९८१ यावर्षी जिल्ह्यात ६ तालुके होते तर १९९१ यावर्षी तालुक्यांची संख्या १३ झाली. अमरावती जिल्ह्याचे विभाजन होवून भातकुली आणि नांदगांव खंडेश्वर या दोन नवीन तालुक्यांची निर्मिती झाल्यामुळे १९८१ च्या तुलनेत अमरावती तालुक्याची लोकसंख्या १९९१ यावर्षी कमी झालेली आढळते.

२००१ यावर्षी जिल्ह्याची लोकसंख्या २६,०७,१६० इतकी होती. यावेळी सर्वात जास्त लोकसंख्या अमरावती तालुक्याची ६,७८,१९२ म्हणजेच २६ टक्के होती. तर सर्वात कमी लोकसंख्या ३.४८ टक्के चांदूर

**सारणी क्र.१**

**अमरावती जिल्ह्यातील लोकसंख्या (1981-2001)**

| अ. क्र. | तहसिल | 1981 | 1991 | 2001 | दशवार्षीक वाढ (टक्के) (1991-2001) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमरावती | 602587 (32.37) | 534986 (24.32) | 678192 (26.01) | 26.77 |
| 2 | भातकुली | | 99654 (4.53) | 108623 (4.17) | 9.00 |
| 3 | नांदगांव (खंडे.) | | 108357 (4.92) | 124604 (4.78) | 14.99 |
| 4 | अचलपूर | 306929 (16.49) | 211400 (9.61) | 252513 (9.68) | 19.45 |
| 5 | चांदूर बाजार | | 161271 (7.33) | 190179 (7.29) | 17.92 |
| 6 | मोर्शी | 302531 (16.25) | 154373 (7.02) | 170891 (6.55) | 10.70 |
| 7 | वरुड | | 182464 (8.29) | 211113 (8.09) | 15.70 |
| 8 | चांदूर रेल्वे | 267156 (14.35) | 161622 (7.35) | 90645 (3.48) | -43.91 |
| 9 | तिवसा | | 124028 (5.64) | 98071 (3.76) | -20.93 |
| 10 | धामणगांव | | -- | 127068 (4.87) | 10.00 |
| 11 | दर्यापूर | 239397 (12.86) | 140767 (6.40) | 162230 (6.22) | 15.25 |
| 12 | अंजनगांव | | 131535 (5.98) | 150384 (5.77) | 14.33 |
| 13 | धारणी | 142810 (7.67) | 113464 (5.16) | 147086 (5.64) | 29.63 |
| 14 | चिखलदरा | | 76136 (3.46) | 95561 (3.66) | 25.51 |
| एकूण | 1861410 | 2200057 | 2607160 | 18.50 | |

**सारणी क्र.२**

**अमरावती जिल्हा - लोकसंख्येची घनता (1981-2001)**


| अ. क्र. | तहसिल | 1981 | 1991 | 2001 | दशवार्षीक वाढ (1991-2001) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमरावती | 274 | 600 | 757 | 157 |
| 2 | भातकुली | | 171 | 781 | 16 |
| 3 | नांदगांव (खंडे.) | | 149 | 159 | 10 |
| 4 | अचलपूर | 241 | 329 | 396 | 67 |
| 5 | चांदूर बाजार | | 256 | 274 | 18 |
| 6 | मोर्शी | 187 | 178 | 211 | 33 |
| 7 | वरुड | | 244 | 283 | 39 |
| 8 | चांदूर रेल्वे | 149 | 178 | 171 | -07 |
| 9 | तिवसा | | 139 | 172 | 33 |
| 10 | धामणगांव | | -- | 207 | -- |
| 11 | दर्यापूर | 181 | 185 | 209 | 24 |
| 12 | अंजनगांव | | 236 | 289 | 53 |
| 13 | धारणी | 36 | 143 | 185 | 42 |
| 14 | चिखलदरा | | 24 | 30 | 06 |
| एकूण | | 152 | 180 | 213 | 33 |
| दशवार्षीक वाढ | | | | | 18.33 |

रेल्वे तालुक्याची होती. इतर तालुक्यात अभिक्षेत्रीय वितरण सर्वासाधारण सारखेच आढळते.

१९९१-२००१ या दशकात सर्वात जास्त लोकसंख्या अमरावती तालुक्यात १,४३,२०६, अचलपूर ४१,११३ तर धारणी तालुक्यात ३३,६२२ ने वाढली. या दशकातील लोकसंख्या वाढीचा विचार केल्यास सर्वात जास्त वाढ चिखलदरा तालुक्यात २९.६३ टक्के आढळते. जिल्ह्याची सरासरी वाढ १८.५० टक्के असून यापेक्षा जास्त वाढ धारणी, अमरावती, चिखलदरा आणि अचलपूर या चारच तालुक्यात आढळते. या दशकात चांदूर रेल्वे या तालुक्याचे विभाजन होवून धामणगांव रेल्वे या नविन तालुक्याची निर्मिती झाली. यामध्ये तिवसा तालुक्यातीलही काही गावे धामणगांव रेल्वे तालुक्यात गेली. त्यामुळे या तालुक्याची वाढ १०० टक्के तर चांदूर रेल्वे आणि तिवसा तालुक्यातील लोकसंख्या वाढ ही वजा मध्ये आढळून येते.

**लोकसंख्येची घनता :-**

१९८१ यावर्षी अमरावती जिल्ह्याची लोकसंख्येची घनता १५२ तर २००१ साली २१३ होती. गेल्या २० वर्षात घनता ६१ ने वाढली म्हणजेच यामध्ये ४० टक्के वाढ झाली. (सारणी क्र.२ मध्ये लोकसंख्येची घनता दिली आहे.) १९८१ यावर्षी सर्वात जास्त घनता अमरावती तालुक्याची २७४ तर सर्वात कमी मेळघाट तालुक्याची ३६ होती. १९९१ यावर्षी जिल्ह्याची घनता १८० होती. म्हणजेच या दशकात घनता २८ ने वाढली. हा वाढीचा दर १८.४२ टक्के होता. यावर्षी सर्वात जास्त घनता अमरावती तालुक्याची ६०० तर सर्वात कमी चिखलदरा तालुक्याची २४ होती. १९९१-२००१ या दशकात घनता ३३ ने वाढली. म्हणजेच दशवार्षीक वाढ १८.३३ टक्के होती. मागील दशकाच्या तुलनेत या




स्त्रोत:- जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, अमरावती जिल्हा

दशकात जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या घनतेत ०.०९ टक्यांनी घट झालेली आढळून येते. २००१ यावर्षी सर्वात जास्त घनता अमरावती तालुक्याची ७५७ तर सर्वात कमी चिखलदरा तालुक्याची ३० होती. जिल्ह्याच्या सरासरी पेक्षा अमरावती, अचलपूर, अंजनगांव सुर्जी, वरुड आणि चांदूर बाजार या तालुक्याची घनता जास्त होती. नकाशात १९९१ आणि २००१ यावर्षीची घनता दर्शविली आहे. (नकाशा क्र.१)

एकंदरित १९८१ ते २००१ या वीस वर्षात लोकसंख्येची घनता अमरावती तालुक्यात जास्त आढळते कारण अमरावती हे जिल्ह्याचे ठिकाण, महानगर पालिका असलेले शहर आहे. या शहराची लोकसंख्या ५ लाखापेक्षा जास्त आहे. या शहरात शैक्षणिक, आरोग्यविषयक सुविधा, वाहतूक व दळणवळणांची साधने, रस्त्यांचे जाळे, रोजगार, औद्योगिकरण, पाण्याची सुविधा, बाजारपेठा, रेल्वे इ. सुविधांमुळे या शहरात लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळेच येथे घनताही जास्त आढळते. अचलपूर-परतवाडा ही जुळी शहरे असल्यामुळे येथेही सोयी-सुविधा जास्त आहे. त्यामुळे या शाहराची लोकसंख्या जास्त आहे. सातपुडा पर्वत पायथ्याच्या पायदानाच्या तालुक्यात लोकसंख्येचे वितरण जास्त आढळते. या भागात पाण्याचा निचरा होणारी मृदा आणि जलसिंचनामुळे येथे संत्रा बागायतीचा विकास झालेला आहे. अमरावती जिल्ह्याच्या एकूण क्षेत्राच्या २६ टक्के क्षेत्र एकट्या चिखलदरा तालुक्याने व्यापले आहे. पर्वतीय प्रदेशामुळे या तालुक्यात फक्त २० टक्केच क्षेत्र कृषी योग्य आहे. पर्जन्याचे प्रमाण जास्त आणि जवळपास सर्व सुविधांचा अभाव तसेच अनुसुचित जमातीची संख्या ७५ टक्केपेक्षा जास्त असल्यामुळे हा तालुका मागासलेला आहे. या सर्व गोष्टीचा परिणाम येथील लोकसंख्येच्या वितरणावर झालेला असल्यामुळे येथे लोकसंख्येचे वितरण अतिशय कमी आढळते तसेच घनताही कमी आढळते.

**निष्कर्ष :-**

अमरावती जिल्ह्यातील १९८१ ते २००१ या दोन दशकातील लोकसंख्येच्या वितरणाचा विचार करता काही निष्कर्ष निघतात. पर्वतीय प्रदेशाचा परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर झालेला आढळतो. अशा भागात लोकसंख्येचे वितरण कमी आढळते. या भागात घनता सुद्धा कमी आहे.शहरी भागामध्ये लोकसंख्येचे वितरण जास्त आढळते. यापुढेही शहरांचा विकास होवून येथील लोकसंख्येचे वितरण जास्तच राहील. त्याचप्रमाणे अशा शहरांमुळे लोकसंख्येच्या घनतेमध्येही वाढ होईल.

जलसिंचन आणि निचरा होणारी मृदा असलेल्या भागात लोकसंख्येचे वितरण जास्त आढळते. फळे व भाजीपाला तसेच सोयाबीनचे उत्पादन जास्त असलेल्या भागात लोकसंख्येचे वितरण जास्त आढळते. उदा. सातपुडा पर्वत पायदानाचा प्रदेश. सोयी-सुविधांमुळे अमरावती शहरामध्ये लोकसंख्येचे वितरण अतिशय जास्त आढळते. त्याचप्रमाणे येथे घनता सुद्धा जास्त आढळते. याचा परिणाम जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या लोकसंख्येच्या वितरणावर आणि घनतेवर झालेला आढळतो.

## संदर्भ ग्रंथ

1 Chandana R.C., A Geography of Population, Kalyani Publishers, New Delhi, 1996
2 District Census Handbook, Armavati District - 1981-91
3 District Gazetter - Amravati District, 1983
4 यादव (१९८१), "लोसंख्या भूगोल", प्राची प्रकाशन, मुंबई-९२, पृष्ठ क्र.-१२
5 सवदी ए.बी., प्रा. कोळेकर पी.एस., "मानवी व लोकसंख्या भूगोल", निराली प्रकाशन, पुणे, १९९९
6 जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, अमरावती जिल्हा, १९९८
7 जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, अमरावती जिल्हा, २००५